# राजारामबापू पाटील एक नेतृत्व

**प्रा. डॉ. सचिन महादेव पाटील,**
सहाय्यक प्राध्यापक, श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर.

.........................................................................................................................................

**प्रस्तावना**

पश्चिम महाराष्ट्रातील विकासामध्ये ज्या प्रमुख नेत्यांची नावे घेतली जातात त्यामध्ये यशवंतराव चव्हाण, तात्यासाहेब कोरे, रत्नाप्पाआण्णा कुंभार, वसंतदादा पाटील आणि राजारामबापू पाटील या सर्वच नेत्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर पश्चिम महाराष्ट्राच्या विकासामध्ये महत्वपूर्ण योगदान दिले. पश्चिम महाराष्ट्राला भौगोलिक परिस्थिती देखील तीतकीच महत्वपूर्ण ठरते. परंतू या भौगोलिक परिस्थितीचा योग्य तो फायदा घेण्याचा व तीला दिशा प्राप्त करुन देण्याचे काम या थोर नेत्यांनी केलेले आहे. राजकारणाबरोबर समाजकारण, सहकार, औद्योगिकरण, शिक्षण या बाबींचा समतोल साधण्याचे काम केलेले आहे. राजकारण करत असताना राजकीय नैतिकेचे पालन, विचारांची पातळी या नेत्यांनी कधीही ढळू दिलेली नाही. प्रत्येक नेत्याचा, कार्यकर्त्यांचा, विरोधी नेत्याचा योग्य तो आदर राखून किंबहुना योग्य त्या ठिकाणी विचारविनिमय सल्ला घेऊन आपल्या भागचा विकास केलेला दिसतो.याच पध्दतीने सांगली जिल्हयाचा त्याचबरोबर वाळवा तालुक्याचा विकास करण्यामध्ये कै. राजारामबापू पाटील यांनी आपले महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. लहानपणापासूनच बापूंवर त्यावेळच्या स्वातंत्र्य चळवळीचा खूप मोठा प्रभाव होता. देशभर चाललेल्या स्वातंत्र्य चळवळींच्या घटनां बापू बारकाईने अभ्यासत, महात्मा गांधीच्या विचाराने प्रेरीत होऊन आपण ही अशा कार्यात सहभाग घेतला पाहिजे हा बापूंचा विचार होता. महात्मा गांधींच्या मवाळ विचारांने बापू आकर्षिले होते. त्यामुळे बापूंनी आपले कार्य आणि कृती महात्मा गांधींच्या विचारांवर आधारित मवाळ पध्दतीने चालू ठेवली होती.

महात्मा गांधींजीच्या स्वदेशी, स्वावलंबन, अस्पृश्यता निवारण, ग्रामसफाई, सुतकताई या कामाच्या माध्यमातून ग्रामीण जनतेला याचे महत्व पटवून देण्याचे काम राजारामबापूंनी केली. अशा समाजशील बापूंनी आपल्या कार्याच्या माध्यमातून सांगली व वाळवा तालुक्याचा विकास घडवून आणला. आज वाळवा तालुक्याची एक वेगळी ओळख झाली. आज तालुक्यात सहकारी साखर कारखाना, दुध संघ, कासेगांव शिक्षण संस्था, सुत गिरणी, बँक तसेच अनेक छोटे मोठे उद्योग आज वाळवा तालुका व आसपासच्या परिसरात निर्माण झाले आहेत. याचे श्रेय निश्चितच बापूंना जाते. कारण बापूंनी या विकास कार्याचा पाया घालून दिलेला आह. बापूंनी केलेल्या या कार्याचा उल्लेख मी माझ्या शोध निबंधात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्रस्तुत शोधनिबंध लिहताना प्राथमिक, दुय्यम साधनांचा वापर केला. तसेच मुलाखती आणि चर्चेच्या माध्यमातून माहिती संकलन केलेली आहे.

**उद्दिष्ट:**

१. राजारामबापूंच्या सामाजीक कार्याचा आढावा घेणे.
२. राजारामबापूंनीकेलेल्या विकास कामांचा आढावा घेणे.

**१. शिस्तप्रिय व उत्तम संघटक:**

राजारामबापूंनी महात्मा गांधी आणि पंडित नेहरुंचे नेतृत्व मानून कॉंग्रेसचे सदस्यत्व स्वीकारले. बापूंनी १९७७ पर्यंत सुमारे ३५ वर्षे कॉंग्रेस पक्षातर्फे जनतेची सेवा केली. तरुण वयात बापूंनी लोकजागृती मंडळ स्थापन करुन त्याच्या मदतीने हरिजनोध्दार, मंदिर प्रवेश, खादी व चरखा संघ, परदेशी कपडयांची होळी आणि कासेगांव शिक्षण संस्थेची स्थापना केली. “बापूंनी कुस्तींचा छंद जोपासला, विद्यापीठ कुस्ती संघाचे नेतृत्व केले.”[१]

बापूंचे सर्व कुटुंब वारकरी संप्रदायातील होते, त्यामुळे त्यांना जहालवादी विचार कधीच पटला नाही. त्यामुळे त्यांनी गांधी विचारांचा मार्ग स्वीकारला. “चरख्यावर सुतकताईचे महत्व

त्यांनी स्वतः खेडयापाडयातून, वाडया वस्त्यांवरुन, फिरुन पटवून दिले, त्यांच्या प्रेरणेने वाळवा तालुक्यात चरखे फिरु लागले"[२] बापू स्वतः शिस्तप्रिय होते. शिवाय अतिशय नम्र व्यक्ती, बापूंच्याकडे उत्तम संघटन कौशल्य होते. एखादे शिबिर, कार्यक्रम घेताना बापू स्वतःत्या ठिकाणी हजर राहून कामाचे नियोजन व मार्गदर्शन करीत असत. येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्यांची, शिबिरार्थींची आदरपूर्वक विचारपूस करत. एखाद्या कार्यकर्त्याने काम चांगल्या पध्दतीने केल्यास त्याच्या कामाबद्दल पाठीवर थाप मारत व त्याचे कौतुक करत. त्यामुळे या कार्यकर्त्याला उत्साह व समाधान लाभत असे. यामुळे बापूंवर प्रेम करणारे असंख्य कार्यकर्ते निर्माण केले.

**२. आझाद विद्यालय स्थापना–**

बापूंनी आपल्या समाज कार्याची सुरुवात आझाद विद्यालय, कासेगांव या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केली. बापूंना स्वतःला शिक्षणाची अत्यंत आवड होती. त्यांनी अतिशय कष्टातून त्यांचे शिक्षण पूर्ण केले होते. त्यांना शिक्षणासाठी कोणत्या अडचणी येतात याची जाण होती. शिवाय शिक्षणाशिवाय समाजाचा विकास होत नाही याची कल्पना होती. बापूंच्या सहकार्यांनी देखील बापूंना शाळा सुरु करण्याचा विचार मांडला होता. "पण त्याकाळी माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी शिक्षण संस्थेची नोंदणी करावी लागे. तेव्हाचा दक्षिण सातारा जिल्हा म्हणजे आजचा सांगली व सातारा मिळून होता. शिक्षण संस्थेच्या नोंदणीसाठी दोन्हीकडची परवानगी लागे. बापूंनी स्वखर्चाने हेलपाटे मारुन कासेगांव शिक्षण संस्थेचे रजिस्ट्रेशन मिळवले. १९४५ च्या जून महिन्यात आझाद विद्यालय, कासेगांव स्थापन करण्यात आले."[३] शिवाय गावातील मुलींनीदेखील शाळेत आले पाहिजे. यासाठी बापूंनी प्रयत्न केले. "कुमुदिनी पाटील ही बापूंच्या शाळेतील पहिली विद्यार्थीनी"[४] या कालावधीत बापू स्वतः शाळेत शिकविण्याचे काम करत. खेडयातील गोरगरिब मुलांना लांबून उन्हा–तान्हातून शाळेत यावे लागत असे. अशा मुलांसाठी बापूंनी "इ.स. १९४८ साली वसतिगृह स्थापन केले व या वसतीगृहाचे नाव 'सर्वोदय वसतिगृह' असे नामकरण केले."[५]

**३. लोकल बोर्डावर निवडः**

तत्कालीन कालखंडात स्थानिक स्वराज्याच्या क्षेत्रात जिल्हा लोकल बोर्ड ही संस्था काम करीत होती, त्या त्या जिल्हयातील जिल्हाअधिकाऱ्यांना हे लोकल बोर्ड मदत करत होते आणि या लोकल बोर्डाचे प्रतिनिधी निवडणुकीच्या माध्यमातून निवडून येत असत. "१९४६ साली बापूंची लोकल बोर्डावर बिनविरोध निवड झाली. तसेच उत्तर व दक्षिण सातारा या संपूर्ण प्रभागातील स्कूल बोर्डाच्या चेअरमन पदाची जबाबदारी बापूंना देण्यात आली."[६] स्कूल बोर्डाच्या चेअरमन पदाची जबाबदारी आल्या आल्या बापूंनी कामाचा घडाका लावला. "खेडयापाडयातून घडक कार्यक्रम हाती घेऊन त्यांनी पहिली ते चौथी पर्यंत मराठी शाळा सुरु केल्या. जेथे चौथीपर्यंत शाळा होती, तेथे सातवीपर्यंतचे वर्ग वाढविले, ज्या शाळा मारुतीच्या देवळात किंवा झाडाखाली सुरु होत्या. त्या शाळांसाठी चार–पाच खोल्यांची इमारत उभा करुन दिली. काही ठिकाणी तीसरी– चौथीपर्यंत शाळा सुरु केली. एक शिक्षकी शाळांच्या अडचणी सोडविल्या. दक्षिण सातारा जिल्हयात एकूण ५२९ गाव होती. त्यापैकी तीन वर्षात १८० गावांमध्ये ४७२ शाळा बांधल्या. एकूण तीन वर्षाच्या कालावधीत या राष्ट्रीय विस्तार योजनेअंतर्गत शाळांच्या इमारती, विहीरी, समाज केंद्रे, तालीम खाने, रस्ते यांचा विकास केला. जत तालुक्यात कानडी, मराठी शाळांची संख्या वाढविण्यात आली, खाजगी मराठी शाळांचे अनुदान वाढविण्यात आले. दक्षिण सातारा लोक बोर्डच्या ज्या काही इतर समित्या होत्या व त्या समित्यावर अंदाज पत्रकात खर्च करण्यासाठी जो पैसा उपलब्ध होता पण तांत्रिक अडचणींमुळे खर्च घेऊ शकणारा नव्हता, असा सर्व पैसा बापूंनी स्कूल बोर्डाकडे वळवून घेतला. बापूंच्या शिक्षण कार्याच्या धडाक्याने खेडया पाडयातील शेतीच्या बांधावर जाणारी, गुरांच्या पाठीमागे फिरणारी, शेतमजुरी करणारी मुले शाळेत जाऊ लागली. याच कालावधीमध्ये त्यांनी सक्तीच्या मोफत शिक्षणाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली."[७] बापूंच्या या कामामुळे खेडयापाडयातील मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध झाली. शाळेत जाणाऱ्यांची संख्या वाढली.

**४. दुष्काळी गावांना मदत:**

दुष्काळी भागांत उन्हाळयाच्या दिवसात लोकांचे खूप हाल होतात. लोकांना मैल—दोन मैलांवरुन हंडयातून पाणी आणावे लागते. त्यात महिला, मुले यांचे खूप हाल होतात. यासाठी बापूंनी "धडक कार्यक्रम हाती घेऊन जिल्हयातील प्रत्येक गावांमध्ये आड—विहीरी खोदल्या. यामध्ये दुहेरी फायदा होता स्थानिक लोकांना रोजगार मिळणार होता व पिण्याच्या पाण्याची सोय होणार होती. या कालावधीत बापूंनी मुंबई ईलाख्याचे सर्व पुरवणी बजेट सांगली जिल्हयाकडे वळविले"[८]याच कालावधीत बापूंनी छोटया छोटया पाझर तलावांची कामे, जमिनीची धूप थांबविण्यासाठी, नालाबंडीगची कामे, आडविहीरींची कामे अशी सार्वजनिक हिताची कामे केली. त्यासाठी शासनदरबारी स्वत: हेलपाटे घालून पैसे मंजूर करुन आणले. सार्वजनिक हिताची कामे कंत्राटदाराकडून करुन घेण्यापेक्षा स्थानिक ग्रामपंचायती मार्फत करुन घेतली. दुष्काळी काम म्हणून वज्रचौंडे भागात अग्रणी नदीवर बंधारा बांधण्यात आला. खडकाच्या पाया विना घातलेला दक्षिण हिंदुस्थानातील हा पहिलाच बंधारा होता. त्यामुळे गव्हाण, अंजनी, मंळणगांव, लांडगेवाडी, शिरढोण, जायगव्हाण यातील सुमारे ३२०० एकर जमिन पाण्याखाली आली. साडेसात मैल लांबीचा कालवा काढण्यात आला. या बंधाऱ्याचे पाणी वापरुन अधिकाधिक धान्य पिकविणाऱ्यास जिल्हा विकास मंडळाने बक्षिस जाहीर केले होते."[९] यावरुन बापूंची दृष्टी लक्षात येते. वाळवा तालुक्यातील काही भागांना नदीकाठ असल्यामुळे हा भाग समृध्द होता. त्याचबरोबर दुष्काळी भागाला देखील पाण्याची सोय व्हावी असा दूर दृष्टिकोन बापूंचा होता.

**५. जनसहभागातून सरकारी काम:**

राजारामबापूंवर गांधी विचारांचा प्रभाव असल्याचे प्रकर्षाने जाणवते. बापूंनी शारिरीक कष्टाला प्राधान्य दिले. त्याचबरोबर लोक सहभागातून काम करण्याची पध्दती राबविली. "ग्रामपंचायतीच्या कार्यालयासाठी वेगळी इमारत बांधायची म्हणजे जागेसहित दगड, विटा, पत्रा, बांधकाम खर्चर मजुर वर्ग अशा सर्वच गोष्टींची आवश्यकता होती. त्यांनी गावकऱ्यांना विश्वासात घेतले. जे काम पूर्वी ठेकेदारांना मिळत होते ते बंद करुन गावातल्या जाणत्या चार मंडळीकडून काम करुन घेण्याचे एक नव तंत्र त्यांनी अवलंबिले, कंत्राटदारी पध्दतीमध्ये बदल घडवून त्यात सुलभता आणली. त्याद्वारे कामाच्या एकूण खर्चामध्ये अर्धी सरकारी मदत आणि बाकीचे श्रमदान अशी विभागणी झाली. त्यामुळे ग्रामीण विकास कार्यास गती येऊ लागली. गावातील पंचमंडळींची बैठक बोलावून जागेचा प्रश्न सोडविला जाई. श्रमदान कोणी करायचे, पैशाच्या रुपाने मदत करण्यास कोण तयार आहे. हे ठरविले जाई. प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्यासाठी बापूंनी जिल्हा बोर्डामार्फत बांधकामाचे सर्व साहित्य पुरविण्याची योजना अंमलात आणली व ती प्रत्यक्ष राबविली. रोख रकमांऐवजी प्रत्यक्ष साहित्य मिळाल्यामुळे खोळंबा न होता कामाचा दर्जा वाढला. इतकेच नव्हे कंत्राटदारांपेक्षा गावकऱ्यांनी कामे चांगली केली."[१०] यावरुन बापूंची काम करण्याची पध्दती तसेच जनसहभागातून सरकारी काम झाल्यास कामाचा दर्जाही उत्तम राहतो व कमी खर्चात काम पूर्ण घेते हे दाखवून दिले.

**६. जप्ती व जमिन महसुल पध्दती बंद:**

बापूंनी महसुल मंत्रीपद स्वीकारल्यानंतर मोठया प्रमाणात शेतकऱ्यांच्या अडचणी व प्रश्न समजून घेण्यास सुरुवात केली व अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. यातील महत्वाचे निर्णय म्हणजे "गरीब शेतकऱ्यांची थकबाकीसाठी होणारी जमीन जप्ती बंद करुन टाकणे, शासन भू—विकास बँक आणि इतर शासकीय माध्यमातून शेतकऱ्यांना हजारो रुपयांची वैयक्तिक कर्जे देत असे, पण अशी कर्जे परतीच्या मार्गावर येत नाही असे. शेतकऱ्यांच्या जमिनीचे लिलाव पुकारुन जप्ती आणून या पैशाची वसूली करण्यात येत असे. बापूंनी ही पध्दती बंद करुन टाकली."[११] बापूंनी शेतकरी हीताच्या दृष्टिने घेतलेला हा महत्वपूर्ण निर्णय होता. शेतकऱ्याने घेतलेले कर्जे दुष्काळ अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे फेडता आली नाही तर जप्ती येत असे. त्यामुळे शेतकऱ्यांना आधार मिळाला. त्याचबरोबर बापूंनी महसुल आकारण्याच्या पध्दतीत

देखील बदल केला. "१९६५ पर्यंत सरसकट जमीन महसूल आकारण्याच्या पध्दतीमुळे हलक्या प्रतिची जमीनधारक शेतकऱ्यांवर अन्याय होत होता. कायद्याने हा अन्याय बापूंनी दूर केला. एखादी जमीन सुपीक असेल, त्या जमिनीची उत्पादनक्षमता चांगली असेल तर संपूर्ण सर्व्हे नंबरचा विचार करुन सरसकट महसूल आकारण्याची पध्दती होती. एखादा सर्व्हे नंबर मोठा असायचा त्यातील भाग असणारी जमीन हलक्या प्रतिची असायची पण त्या शेताचासुध्दा, जादा महसुल शेतकऱ्यांना भरावा लागत असे. नंतर बापूंनी सर्व्हे नंबर कोणताही असो त्या शेतीची उत्पादनक्षमता कोणत्या प्रकारची आहे. त्यावर महसूल आकारणी करण्यात यावी, त्या शेतजमिनीची प्रतवारी ठरविल्यानंतर प्रतवारी व उत्पादनक्षमता यांची सांगड घालून महसूल आकारण्यात यावा असा महत्वपूर्ण बदल नव्या कायद्यात बापूंनी घडवून आणला."[१२]

**७. मार्केट ॲक्ट:**

"ॲग्रीकल्चर प्रोडक्टस् ॲक्ट नावाचा कायदा पास केला. हा कायदा वाळवा व खानापूर तालुक्यातील शेंगदाणे व हळद या शेतीमालाच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारात १/८/१९४८ पासून लागू करण्यात आला. ताकारी मार्केट कमिटी ही या जिल्हयातील पहिली मार्केट कमिटी, त्यानंतर सदर कायदा मिरज तालुक्यातील शेंग, गुळ, मिरची या शेतीमालाच्या खरेदी विक्रीचे व्यवहारास लागू करण्यात आला व सांगली मार्केट कमिटीची वसंतदादांच्या अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात आली."[१३]

**८. सहकार चळवळ:**

सहकार चळवळ स्थापण्यामागचा मुळ हेतू सामान्य माणसाचा विकास एकमेकांच्या सहकाऱ्याने व्हावा हा होता. त्याचबरोबर लोकांच्या हाताला रोजगार मिळावा. बापूंनी या हेतुने सहकार क्षेत्राचा मोठया प्रमाणात विकास केला. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या कच्च्या मालावर प्रक्रिया उद्योग जवळच सुरु व्हावेत असे त्यांना वाटे. "राजारामबापू पाटील यांच्या आयुष्यातील आनंदाचा क्षण कोणता असावा? या प्रश्नाचे उत्तर राजारामबापूंनीच वाळवा सहकारी साखर कारखान्याच्या शुभारंभ झाला त्यादिवशी दिले. 'मी जे स्वप्न पाहिले होते, ते आज पुरे होत ओहे. आज माझ्या आयुष्यातला अत्यंतिक आनंदाचा दिवस आहे.' वाळवा कारखान्याच्या उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी बापूंनी आपल्या भावना व्यक्त केल्या. १९६९ साली वाळवा सहकारी साखर कारखाना उभा राहिला."[१४] १२५० मेट्रीक टनाच्या साखर कारखान्याला परवानगी मिळाली. "१९७२ ते १९७५ या काळात वाळवा तालुक्यामधील सगळया शेतकऱ्यांच्या सभा घेऊन शेतीला जोडधंदा म्हणून 'वाळवा तालुका दुध संघ' उभा करण्याचा निर्णय केला आणि त्यानुसार त्यांनी राष्ट्रीय दुध प्रकल्प मंडळाकडून या दूध संघाकरीता मान्यताही मिळवली. राजारामबापू पाटील यांनी आपल्या निवडक सहकाऱ्यांसह आणंद येथे जाऊन या प्रकल्पाची पूर्ण माहिती घेतली आणि इस्लामपूर येथे १९७५ साली 'वाळवा तालुका दुध संघ' उभा केला." [१५]

वाळवा तालुक्यातील शेतकऱ्यांना, कामगारांना पैशाची सोय व्हावी कर्जे मिळावीत, या माध्यमातून लोकांना आर्थिक हातभार लागेल. या हेतुने बापूंनी २६ जून १९८१ रोजी 'वाळवा सहकारी बँकेची निर्मिती केली'. "१९६८ साली 'वाळवा ग्राहक भांडार' ही सहकारी तत्वावरील एक संस्था स्थापन झाली. त्या निमित्ताने तालुक्यातील होतकरु कष्टाळू युवकांना रोजगार संधी उपलब्ध झाली. त्याचबरोबर वाळवा 'कंझ्युमर्स स्टोअर्स', वाळवा सहकारी प्रिटींग प्रेस याही संस्थांची उभारणी केली."[१६]

**८. नवीन उद्योगधंद्यांना चालना:**

बापूंनी शेतीबरोबरचनवीन उद्योगधंद्यांना चालना दिली. शेतीबरोबर छोटे व लघु उद्योग चालु झाले पाहिजेत, नवीन तरुणांनी उद्योग उभा करावेत असे बापूंना वाटत होते. "उद्योग खात्याच्या माध्यमातून बापूंनी राबविलेल्या अनेक पुरोगामी धोरणांमुळे कोलकत्ता या ठिकाणी असणारे मोठे कारखाने स्थलांतर करुन मुंबईत आले. १९७६ नंतर पश्चिम बंगालमध्ये डाव्या कम्युनिस्ट पक्षाचे मंत्रिमंडळ स्थापन झाले होते. त्यामुळे तेथे कारखानदार व कम्युनिस्ट सरकार यांच्यात

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

संघर्ष सुरु झाला. देश पातळीवरील सर्व घटकांचा बारकाईने अभ्यास करणाऱ्या बापूंनी कोलकत्याच्या कारखानदारांना महाराष्ट्रात सोई सवलती दिल्या. परिणामी पुणे, मुंबई, नाशिकच्या भागात महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती झपाटयाने झाली. हजारो महाराष्ट्रातील तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली."[१७]

महाराष्ट्राचे उद्योगमंत्री असताना महाराष्ट्रात उद्योगधंदे चालू व्हावेत म्हणून अनेक सवलती दिल्या. "उद्योगाचे विकेंद्रीकरण करुन ग्रामीण भागात उद्योगधंदे नेऊन औद्योगिक प्रगतीमधील असमतोल कमी करण्याचे महाराष्ट्रात शासनाचे धोरण आहे. महाराष्ट्रामध्ये नवीन उद्योग काढणाऱ्यास जमीन, पाणी, वीज यांची उपलब्धता करुन देणे त्याचप्रमाणे त्यास लागणारे भांडवल ७५ टक्के पर्यंत कर्जाच्या रुपाने सुरु करण्यास कमी व्याजाच्या दराने कर्ज देते आणि कोणताही नवीन उद्योग सुरु करण्यास पहिली सहा वर्षे काही मर्यादेपर्यंत सेल्स टॅक्सची रक्कम त्यास परत करुन ती त्यास बिनव्याजी कर्ज म्हणून १८ वर्षे वापरण्यास परवानगी देणे इ. गोष्टी, शासन नवीन उद्योगधंदे महाराष्ट्राच्या अविकसित भागात निघण्याच्या दृष्टीने प्रयन करीत आहेत. राज्याच्या अविकसित भागात देखील उद्योगधंदे सुरु व्हावेत म्हणून वेगवेगळया प्रकारच्या इन्सेंटिव्ह स्कीम्स महाराष्ट्राने सुरु केल्या आहेत. आपल्या देशात अशा प्रकारच्या योजना राबविणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे."[१८] अशा रीतीने बापूंनी उद्योगधंदे महाराष्ट्रात यावेत, त्यांना चालना मिळावी यासाठी सवलती, योजना जाहीर करुन आकर्षित केले यानंतर महाराष्ट्रात मोठया प्रमाणात उद्योगधंदे सुरु झाले.

एकंदरच बापूंच्या कार्याचा आढावा घेतला असता पश्चिम महाराष्ट्रातील ज्या प्रमुख नेत्यांचा उल्लेख होतो त्याप्रमाणे राजारामबापू पाटील यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाची ओळख आपल्या कामाच्या माध्यमातून करुन दिली. सांगली जिल्हा तसेच वाळवा तालुक्यातील विकासामध्ये बापूंनी खूप मोठी ताकत लावली होती. किंबहुना आज वाळवा तालुक्याची जी ओळख आहे ती बापूंच्यामुळेच बापूंच्या पश्चात वाळवा तालुक्याची विकासाची घोडदौड मोठया प्रमाणात चालु आहे. वाळवा तालुका सहकारी आणि खाजगी उद्योगधंदांमुळे अग्रेसर आहे. यामध्ये सहकारी साखर कारखाने दुध संघ, बँका, शिक्षण संस्था, मेडिकल कॉलेज, इंजिनिअरिंग कॉलेज, टेक्स्टाईल इंडस्ट्री, फार्मसी कॉलेज, नर्सिंग कॉलेज इ. ज्या संस्था उभ्या आहेत. या सर्वांचा पाया बापूंनी घालून दिलेला आहे.

**संदर्भसूची:**


१. चव्हाण सरोजनी—'राजयोगी', ज्योतिर्मय पब्लिकेशन, पुणे, जानेवारी २०१८, पृ. ३८.
२. कित्ता, पृ. क्र. ४३.
३. कित्ता पृ. क्र. ५१.
४. कित्ता पृ. क्र. ५२
५. कित्ता पृ. क्र. ५३
६. कित्ता पृ. क्र. ५७
७. कित्ता पृ. क्र. ५८—५९
८. कित्ता पृ. क्र. ७८
९. कित्ता पृ. क्र. ७९
१०. कित्ता पृ. क्र. ८३
११. कित्ता पृ. क्र. १४९
१२. कित्ता पृ. क्र. ८५
१३. कित्ता पृ. क्र. ८५
१४. भावे मधुकर — 'बापू', राजारामबापू ज्ञान प्रबोधनी, इस्लामपूर, पृ. क्र. १३६
१५. कित्ता पृ. क्र. १७३
१६. चव्हाण सरोजनी, पृ. क्र. १८४—१८५
१७. कित्ता, पृ.क्र. १६१—१६२
१८. कित्ता, पृ. क्र. १६३